# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

द्वितीय सत्र परीक्षा 2019–20

विषय – मराठी

समय –2.00 घंटे | वर्ग – **6 (A,C,D,E,F,)** | गुण – 40

---

**प्रश्न 1ला अ पुढील उतारा वाचून त्याखालील चौकटी पूर्ण करा.**


तुम्ही दूध-दही-तूप खाता! गाई-म्हशींपासून हे आपण मिळवतो; पण या गाई-म्हशी जगतात कशावर? गवत व कडबा यांवर. हे कोण त्यांना देते? आपली मोठी आई.

जगात जी जी सुंदर गोष्ट दिसते ती अशा प्रकारे मोठ्या आईपासून उत्पन्न झालेली आहे. जगलेली आहे व वाढलेली आहे!


ती तुम्हांला अन्न-वस्त्र देते, दागिने देते, घरदार देते, धनधान्य देते, भांडीकुंडी देते, चहासाखर, पाटीपेन्सिल देते, सगळे सगळे देते. त्या मोठ्या आईचे केवढे उपकार मानले पाहिजेत! अन् मग अशी जी जमीन किंवा धरणीमाता तिचे छोटेसे रूप म्हणजे आपली मातृभूमी! त्या भूमीतले अन्न खाऊनच आपण मोठे झालो, शहाणे झालो. माणसांना प्रत्येक गोष्ट दिली ती या भूमीनेच. त्या मायभूमीबद्दल आपण मनात नेहमी प्रेमभाव बाळगावयास नको का?

आपली मोठी आई म्हणजेच आपली मायभूमी!

**1)** कृती **(2)**




**2)** कृती **(1)**




3) उताऱ्यातील सर्वनामे शोधून लिहा. (1)

4) आपण मातृभूमीबद्दल प्रेम भाव का बाळगावा, हे तुमच्या शब्दांत लिहा (2)

**प्र. 2 रा पुढील उतारा वाचून त्याखालील चौकटी पूर्ण करा.**

"मी तर इथंच राहतो" ते म्हणाले.

"नाहीच मुळी. आमच्या नदीतही एक छान छान कासवदादा आहेत."

"ते वेगळे. मी समुद्रात राहतो! पण तू इकडं का आलीस? इथं तर पावला - पावलांवर संकटं उभी आहेत. बघितलंस किती चित्रविचित्र मासे फिरतायत इकडून तिकडे! तो आठ हात असलेला अष्टभुज मासा. तो कसा उलटा चालतोय, बघितलंस का? पाण्याच्या चुळा भरत हळूहळू मागं सरकतो. आपल्या आठ हातांनी मासे, खेकडे पकडून खातो. पाण्यात उतरणारी माणसंसुद्धा त्याला घाबरतात बरं का!"

"पण कासवदादा, इथं तर तळाला नदीसारखेच शंख-शिंपले पडलेले आहेत!"

"पण नदीतल्या शंख-शिंपल्यांत काय असते? इथं या दोन शिंपल्यांच्या पेटीत एक किडा बसलेला असतो बरं का! त्याला चालायचं असलं, की आपले

**1) कृती** **(1)**

आपल्या आठ हातांनी पकडून खातो.

↓ [ ] ↓ [ ]

**2) कृती** **(1)**

इथं तर तळाला नदीसारखेच पडलेले असतात

↓ [ ] ↓ [ ]

**3) खालील शब्दांना विशेषण लावा** **(2)**

| **नाम** | **विशेषण** |
|---|---|
| 1) पाणी | अ. मुसळधार |
| 2) डोळे | ब. इवलीशी |
| 3) पाऊस | क. खारद |
| 4) मिनू | ड. बटबटीत |

**4) तुम्हाला कोणता मासा आवडतो ? का?** **(2)**

**प्र. 3 रा खालील कविता वाचून आकृती पूर्ण करा.**

होळी आली होळी
खावी पुरणाची पोळी,
झाडे, फांद्या तोडू नका,
केर-कचरा खड्ड्यात टाका.

होळी आली होळी
भरा सद्गुणांची झोळी,
अनिष्ट रूढी, प्रथांची
बांधू होळीसाठी मोळी.

होळी आली होळी
ठेवू पर्यावरणाचे भान,
नका तोडू वृक्ष राजी
घ्यावी आज अशी आण.

**कृती** 1) होळीला काय तोडू नका असे म्हटले आहे? → [ ] [ ] **(1)**

**2) कृती** होळीसाठी यांची मोळी बांधणार आहोत → [ ] [ ] **(1)**

3) होळीच्या वेळी झोळी भरावी → [ ] **½**

4) होळीच्या दिवशी कोणती शपथ घ्यायला सांगितले → [ ] [ ] **½**

5) स्वमतः
'पर्यावरणाचे भान ठेवून होळी साजरी करा' याबाबत तुमचे मत लिहा. **(1)**

**6) शेवटचे अक्षर सारखे असलेले शब्द कवितेतून शोधून लिहा.** **(1)**

1) ______ ______ 2) _____ ______

3) ______ _____ 4) _____ _____

**प्र. 4 था** **व्याकरण – विभाग**

**अ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **(1)**

1) आठवण – ---------- 2) जल – ---------
3) माया – ------- 4) प्रचंड – ----------

**ब) विरूद्धार्थी शब्द लिहा (कोणतेही – दोन)** **(1)**

1) तृप्त X ------ 2) सज्जन X ------
3) अवघड X ----- 4) निकृष्ट X -------

**क) वचन बदला. (कोणतेही – दोन)** **(1)**

1) पोळी – ------ 2) फांद्या – -------
3) खड्डा – ------ 4) वृक्ष – -------

**ड) लिंग बदला (कोणतेही दोन)** **(1)**

1) शिक्षिका – ------- 2) गाय – ------
3) दादा – ------- 4) आजोबा – -------

**इ) खालील वाक्यांतील काळ ओळखून लिहा. (कोणतेही एक)** **(1)**

1) रिमा सहलीला गेली.
2) वंदना अभ्यास करते.


**ई) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** **(2)**

1) उदास होणे
2) डोळे पाणावणे.
3) नवल वाटणे

**3) खालील वाक्यांत (? ! ' –' ''–''. ,) घालून वाक्ये पुन्हा लिहा** **(1)**
**कोणतेही एक**

1) आहाहा किती छान चित्र आहे
2) तुला लाडू आवडतो का

**ऊ) पुढे दिलेल्या 'ऊन' या शब्दाला विशेषण लावा.** **(2)**



**प्र. 5 वा खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा.** **(5)**

1) मी पाहिलेली पहाट

(मुद्दे पहाट – फिरायला जाणे – वाऱ्याची झुळूक – पूर्व दिशा उजळणे – लाल, गुलाबी, केशरी रंग – झाडांचे शेंडे सोनेरी – पक्ष्यांचा किलबिलाट – गाव जागे)

2) आमची सहल

(मुद्दे– डोंगरावर सहल – पायथ्याशी गेल्यावर न्याहारी – डोंगर चढून जाणे – चढताना दमणे – शिखरावर गेल्यावर मन प्रसन्न – जेवण – वन – विहार – वृक्षवेली – आनंद.)

3) होळी –

मुद्दे – महत्त्वाचा सण – होळी– कशी उभारतात? पुजा, नैवेद्य – होळी पेटवणे – नाचणे, गाणी म्हणणे – उद्देश – धुलिवंदन – रंगपंचमी.

**प्रश्न 6 वा खालील एका विषयावर पत्र लिहा.** **(4)**

1) तुमच्या मैत्रिणीला मे महिन्याच्या सुट्टीत घरी येण्याचे आमंत्रण देण्यासाठी पत्र लिहा.


**किंवा**

2) शैक्षणिक सहलीसाठी बसची चौकशी करणारे पत्र एस. टी. बस आगार व्यवस्थापक, नागपूर सेंट्रल यांना लिहा.

**प्रश्न 7 वा खालील चित्रांचा सहसंबंध लावून गोष्ट तयार करा.** **(4)**


1) फुलपाखरू 2) पतंग

3) क्रिकेट 4) आकाश



किंवा

प्र. 7 वा शाळेच्या परिसरात स्वच्छताविषयक पाट्या लावायच्या आहेत तुम्ही कोणत्या पाट्या तयार कराल ते लिहा.



***